**FOREST DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.,**
(A Govt. of Maharashtra Undertaking)
**OFFICE OF THE GENERAL MANAGER, NAGPUR REGION, NAGPUR.**

क्रमांक : एफडीसीएम/महाव्यनाप्र/आस्था/प्र.क.681–1/४३४ नागपूर, दिनांक 7 JUN 2024 /2024

## कार्यालयीन आदेश

विषय : अनुकंपा तत्वावरील उमेदवाराची वनरक्षक या पदावर नियुक्ती व पदस्थापना करणेबाबत.

एफडीसीएम लिमिटेडमध्ये अनुकंपा तत्वावर सेवाभरती करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याचे दृष्टिने नागपूर प्रदेश, येथील खालील अनुकंपाधारक यांची वनरक्षक या पदावर या पदावर सुधारित वेतन संरचनेत (सातव्या वेतन आयोगानुसार) वेतन स्तर एस–5 (18000–56900) मधील वेतन रूपये 18000/– या वेतनश्रेणीत नियमानुसार मिळणाऱ्या इतर भत्त्यासह निवड केली असून त्यांची पदस्थापना खालील नमुद तक्त्यानुसार करण्यात येत आहे. करीता त्यांना नियुक्ती देण्याकरीता पुढील कार्यवाहीस्तव आपणांकडे पाठविण्यात येत आहे.

| अ.क. | नाव | पत्ता | नियुक्तीचा प्रवर्ग | नियुक्तीनंतर पदस्थापना करावयाचा विभाग/कार्यालय |
|---|---|---|---|---|
| 1 | मिथुन रामु बोरसरे<br>मो.नं. 8308172710 | मु. मुरुपार पो. विरखंडी/धा.<br>ता. भिवापुर जि. नागपूर 441201 | खुला | वन प्रकल्प विभाग,<br>नागपुर |
| 2 | वशिम नाशिर शेख<br>मो.नं. 8080413671 | मु. उसगाव ता. साकोली<br>जि. भंडारा 441802 | खुला | वन प्रकल्प विभाग,<br>भंडारा |
| 3 | भुषण वसंता खारकर<br>मो.नं. 7499790966 | दिघोरा मु.पो.ता. भिवापुर<br>जि. नागपूर 441201 | खुला | वन प्रकल्प विभाग,<br>नागपुर |
| 4 | गौरव रमेश चंद्रे<br>मो.नं. 9511000828 | एफडीसीएम कॉलनी किनवट<br>जि. नांदेड 431804 | खुला | वन प्रकल्प विभाग,<br>किनवट |

2.00 वरील अनुकंपा धारक यांना देण्यात आलेली नेमणूक ही महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अकंपा 1221/प्र.क. 186/आठ दिनांक 26 ऑगस्ट 2021 अनुसरून अनुकंपा नियुक्तीचे पदाचे उपलब्धतेनुसार खालील/पुढील अटी व शर्तीचे अधीन राहून देण्यात आली आहे, हे त्यांचे निदर्शनास आणून द्यावे.

1) नियुक्तीपूर्वी संबंधीत उमेदवाराचे सदर पदास लागणारी पात्रता, मूळ कागदपत्रांची प्रत्यक्ष काळजी पूर्वक तपासणी करून घेण्यात यावी.

2) नियुक्तीपूर्वी उमेदवार सदर पदासाठी स्वास्थ दृष्टया सुदृढ असल्याचे संबंधीत जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करवून घ्यावे, त्यावरून उमेदवारांची स्वास्थाबाबत शहानिशा करावी.

3) उमेदवारास देण्यात आलेली नेमणूक ही तात्पूरत्या स्वरूपाची असून तात्पुरत्या स्वरूपात असलेल्या कोणत्याही पदाची मुदत संपल्यानंतर किंवा कोणतेही पद महामंडळाकडून कमी करण्यात आल्यास किंवा कोणत्याही कारणाने पद अतिरिक्त झाल्यास किंवा शासन नियमानुसार व महामंडळाचे प्रचलित नियमानुसार काही न्युनता आढळल्यास त्यांना देण्यात आलेली नेमणूक संपुष्ठात येईल. तसेच सदर नेमणूकीसाठी त्यांना कोणताही हक्क प्रस्थापित करता येणार नाही तसेच उमेदवारांना याबाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

4) उमेदवारास एफडीसीएम लिमी., च्या कोणत्याही कार्यक्षेत्रामध्ये काम करावे लागेल. सध्या एफडीसीएम लिमी., मध्ये जे सेवानियम, कंपनीचे कायदे तथा इतर नियम अस्तित्वात आहे ते आपणास लागू होतील तसेच या नियमामध्ये वेळोवेळी ज्या सुधारणा होतील किंवा नियम अस्तित्वात येतील ते त्यांना बंधनकारक राहतील.

5) उमेदवाराची नियुक्ती संबंधीत जिल्हा पोलीस अधिक्षकाकडून चारीत्र्याबाबतचे प्रमाणपत्राचे अधीन राहून देण्यात येत आहे. तपासणी अंती त्यांचे चारीत्र्य/पूर्व चारीत्र्य असमाधानकारक आढळून आल्यास कोणतेही कारण न दाखविता त्यांना महामंडळाच्या सेवेतून कमी करण्यात येईल.

6) उमेदवारास सेवेचे त्यागपत्र द्यावयाचे झाल्यास 1 महिना अगोदर पूर्व सुचना देण्यात यावे, अन्यथा त्यांचे एक महिन्याचे वेतन वसुली करून महामंडळात जमा करण्यात येईल.

7) उमेदवाराचे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र/गुणपत्रिका, तसेच लागु असलेले इतर प्रमाणपत्र सक्षम प्राधिकाऱ्याकडे तपासणीसाठी पाठविण्यात येईल. सदर दस्तावेज/प्रमाणपत्र खोटे आढळून आल्यास नियमाप्रमाणे कमी करण्यात येईल.

8) उमेदवारास कोणत्याही प्रकारचे पुढील शिक्षण घ्यावयाचे असल्यास किंवा दुसरे ठिकाणी नौकरी करीता अर्ज सादर करावयाचा असल्यास संबंधीत नियुक्ती अधिकाऱ्याकडून पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

9) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, मुंबई क्र. एसआरव्ही – 2000/प्रक 17/2000/बारा, दिनांक 28 मार्च 2005 चे अधिसूचने प्रमाणे शासन सेवेत रूजू होताना उमेदवाराकडून लहान कुटूंब प्रतिज्ञापत्र विहित नमुन्यात भरून घ्यावे.

10) उमेदवारास नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्याबर रूजू तारखेपासून आपला 2 वर्षाचा कालावधी हा परिविक्षाधीन कालावधी म्हणून संबोधण्यात येईल. सदर कालावधीत महामंडळाचे नियमानुसार वनरक्षक या पदासाठी लागु असलेले प्रशिक्षण उत्तीर्ण करावे लागेल. प्रशिक्षणात उत्तीर्ण न झाल्यास ते पुढील पदावर पदोन्नतीकरीता पात्र राहणार नाही.

11) वनरक्षक पदावर रूजू झाल्यानंतर संबंधित उमेदवार कोणत्याही वेळी या पदासाठी अपात्र असल्याचे निदर्शनास आल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

12) सदर आदेश प्राप्त झाल्यापासून वरील प्रमाणे वनरक्षक पदाकरिता सर्व अटी मान्य असल्याबाबत लेखी संम्मतीपत्र रू.500/--चे स्टॅम्प पेपरवर नोटरी करवून घेवून 30 दिवसांचे आत रूजू होणेबाबत कळवावे.

3.00 उपरोक्तप्रमाणे संबंधीत अधिकाऱ्यांनी उमेदवारास त्यांचे स्तरावरून नियुक्ती द्यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

7/6/24

(चंद्रसेकरन बाला एन)
महाव्यवस्थापक
नागपूर प्रदेश, नागपूर

प्रति,
विभागीय व्यवस्थापक
वन प्रकल्प विभाग,
नागपूर/भंडारा/किनवट
प्रतिलीपी : व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लिमी., नागपूर यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रतिलीपी : आदेश फाईल/सुचना फलक